# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना** :- आशीनगर झोन क्र. ०९, प्रभाग क्र. ०७, अंतर्गत नॉर्थ कॅनल
**{सा.बां.वि. झोन क्र. ०९}** येथील नाल्याचे भिंतीचे बांधकाम करण्याचे सन २०२५-२६ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात मुख्यालयीन पद क्र. A४३९०१३७०८१२ (नागपूर शहरातील नाले बांधणे) अंतर्गत रु. ४९,४९,७८८/- लक्ष राशीची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली असुन प्रस्तुत कामास **SE/PWD/TS/66/2025-26** दिनांक ०८.०७.२०२५ अन्वये मा. अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. तरी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टिप:- सविस्तर तपशिल नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 206/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 01/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, आसीनगर झोन क्र. ०९ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार आशीनगर झोन क्र. ०९, प्रभाग क्र. ०७, अंतर्गत नॉर्थ कॅनल येथील नाल्याचे भिंतीचे बांधकाम करण्याचे सन २०२५-२६ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पात मुख्यालयीन पद क्र. A४३९०१३७०८१२ (नागपूर शहरातील नाले बांधणे) अंतर्गत रु. ४९,४९,७८८/- लक्ष राशीची तरतुद उपलब्ध करुन देण्यात आली असुन प्रस्तुत कामास **SE/PWD/TS/66/2025-26** दिनांक ०८.०७.२०२५ अन्वये मा. अधिक्षक अभियंता यांची तांत्रिक मान्यता प्राप्त आहे. तरी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.